CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**नवराष्ट्र** | मुंबई, २२ जानेवारी २०२५

# नवी मुंबई विमानतळाला जलमार्गाने जोडणार

## १० हजार वॉटर टॅक्सींचा प्रस्ताव ; गडकरींची माहिती

**मुंबई,** महानगरातील कोंडीवर जलमार्गाने तोडगा काढला जाणार असून, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालाही जलमार्गाने जोडण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मंगळवारी दिली. आर्थिक राजधानी मुंबईसह ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार येथून नवी मुंबई विमातनळ गाठण्यासाठी १० हजार वॉटर टॅक्सींच्या प्रस्तावावर चर्चा सुरू आहे, असेही ते म्हणाले. मुंबईत आयसीईआरपी २०२५



प्रदर्शनात ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत या कल्पनेवर आधीच चर्चा केली असल्याचेही त्यांनी सांगितले. गडकरी म्हणाले, वॉटर टॅक्सीने विरार, कल्याण-डोंबिवली सारख्या उपनगराला अरबी समुद्राच्या मार्गे ७० मिनिटांत नवी मुंबई विमानतळाला जोडणे शक्य होणार आहे. यासाठी मुंबईत १० हजार वॉटर टॅक्सींची गरज आहे, असे ते म्हणाले. नवी मुंबई विमानतळावरून प्रवासी वाहतूक पुढील वर्षी एप्रिलपासून सुरू होऊ शकते, अशी शक्यता आहे.

CIDCO

WE MAKE CITIES

NEWS

**लोकदृष्टी** बुधवार दि. २२ जानेवारी - २०२५

# घणसोलीतील अनधिकृत बांधकामांवर सिडकोची कारवाई

ऐरोली (प्रतिनिधी)-सिडको क्षेत्रात कोणताही विकास परवाना न घेता करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे सत्र सिडकोतर्फे गेल्या काही दिवसांपासून हाती घेण्यात आले आहे. त्यानुसार सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली अनधिकृत बांधकाम नियंत्रक (उत्तर) विभाग यांच्या पथकाने नुकतीच मौजे घणसोली सर्व्हे नं-१५९ से-१६ येथील अनधिकृत बांधकामावर कारवाई केली.

घणसोली से-१६ येथील परिसरात सर्व्हे क्रं.१५९ येथील जमिनीवर विनापरवानगी १०२.६९ चौ.मी.मापाचे (अंदाजे) अनधिकृतपणे आरसीसी तळमजल्याचे बांधकाम हाती घेण्यात आले होते. यासंदर्भात अनधिकृत बांधकामधारक रूषीकेश रतननाथ पाटील यांना सिडकोतर्फे महाराष्ट्र प्रादेशिक नगर नियोजन अधिनियम १९६६ च्या कलम क्रं५४ (१) अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. मात्र त्यानंतरही सदरठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आल्याने अखेरीस सिडको प्रशासनाने योग्य ती कायदेशीर प्रकिया अवलंबून सदरच्या या अनधिकृत बांधकामावर कारवाई केली आहे.



CIDCO
WE MAKE CITIES



नवराष्ट्र
Thane Navi Mumbai Plus Edition
Jan 22, 2025 Page No. 4

# घणसोलीत अनधिकृत बांधकामावर हातोडा



नवी मुंबई, (वा.) गुणाली तलावाकडून घणसोली गावात जाणाऱ्या रस्त्यावर अनधिकृत आरसीसी इमारतीच्या सुरू असलेल्या बेकायदेशीर बांधकामांवर सिडकोच्या अतिक्रमण विभागाने सोमवारी दुपारी कारवाई केली. विकासकाला बांधकाम थांबवण्यासाठी सूचना देऊनही आरसीसीचे काम सुरूच ठेवल्याने कारवाई करण्यात आली. घणसोली एफ विभागात ऋषिकेश पाटील यांनी सिडकोच्या भूखंडावर १०२ चौ. मी. क्षेत्रफळाचे चार मजली अनधिकृत इमारतीचे बांधकाम सुरू होते. याप्रकरणी चालू बांधकाम 'जैसे थे' स्थगित ठेवण्याचे सिडकोच्या अतिक्रमण विभागाने एमआरटीपी ५४ अंतर्गत नोटीस बजावली होती. सिडकोचे गवळी आणि डॉ. जगन्नाथ वीरकर आणि सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

बुधवार, २२ जानेवारी २०२५ लोकसत्ता

# शहाबाज गावातील अनधिकृत बांधकाम उद्ध्वस्त



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई:** बेलापूरनजीक शहाबाज गावातील दोन अनधिकृत बांधकाम सिडकोच्या अतिक्रमण विरोधी पथकाने उद्ध्वस्त केले. दोन्ही ठिकाणी बांधकाम करणाऱ्या अनधिकृत बांधकाम धारकांना नोटीस बजावण्यात आल्या होत्या मात्र तरीही बांधकाम सुरु ठेवल्याने सिडकोने सोमवारी ही कारवाई केली.

बेलापूर नजीक शहाबाज गावातील भूखंड क्रमांक ४१६, ४१८ येथे मधुकर म्हात्रे यांनी बांधकाम सुरू केले होते. या भूखंडावर ४०३. ६२ चौरस मीटर वर पक्के बांधकाम उभारले होते. तसेच भूखंड क्रमांक ४१८ वरील बी. ३९१, ३९०, ३८९ जागेवर १७६ चौरस मीटरचे बांधकाम सुरु करण्यात आले होते. या प्रकरणी समीर मानकामे या अनधिकृत बांधकाम धारकाला नोटीस बजावण्यात आली होती. त्याकडे दुर्लक्ष करून बांधकाम सुरूच ठेवण्यात आले होते. या ठिकाणीही धडक कारवाई करण्यात आली. ही कारवाई मुख्य सुरक्षा अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

साप्ताहिक वृत्त रेषा २१ जानेवारी ते २७ जानेवारी २०२५

# नवीमुंबई विमानतळावर विमान उड्डाणासाठी विमान कंपन्यांची तयारी सुरू

नवीमुंबई । इंडिगो या सर्वात मोठ्या वैमानिक कंपनीने हवाई उड्डाण क्षमता वाढवण्याची तयारी चालवली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प अंतिम टप्प्यात असून या विमानतळावर पुन्हा एकदा भरारी घेण्यासाठी इंडिगोसह अन्य विमान कंपन्यांनी चाचणी सुरू केली आहे. यासाठी गेल्या आठवड्यात वैमानिक, अभियंते तसेच केबिन क्रू यांच्यासह चाळीस जणांची टीम इंडिगो मार्फत तयार करून या टीमने आपला पदभार स्वीकारला आहे. अन्य विमान कंपन्यांनी देखील यासाठी तयारी चालवली आहे.

नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ १७ एप्रिल २०२५ पासून तीन टप्प्यात काम सुरू होणार आहे. विमानतळावरून देशांतर्गत उड्डाणे आणि मालवाहू उड्डाणे १५ मे २०२५ रोजी सुरू होतील आणि त्यानंतर जुलै २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय सेवा सुरू होतील. २९ डिसेंबर २०२४ रोजी इंडिगोच्या एनएमआयएला झालेल्या ऐतिहासिक पहिल्या चाचणी उड्डाणानंतर याबाबत धोरणे ठरवण्यात आली आहेत. या चाचणी उड्डाणात आयएई इंजिनांनी सुसज्ज असलेल्या ११ वर्षे जुन्या एअरबस ए ३२० विमानाचा वापर करण्यात आला, जो विमानतळाच्या विकासातील एक महत्वाचा टप्पा होता.

(पान २ वर)



# खासगी विमानांना नवीमुंबई विमानतळावर लवकरच मिळणार पार्किंग

नवीमुंबई । मुंबई विमानतळावरून बहुतेक व्यावसायिक जेट्स, टर्बोप्रॉप्स आणि चार्टर विमाने लवकरच नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर स्थलांतरित होण्याची शक्यता आहे. शहरातील सामान्य विमान वाहतुकीसाठी मर्यादित पार्किंग जागेची समस्या सोडवण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे. नवीमुंबई विमानतळ अंशतः क्षमतेने एप्रिल महिन्यात सुरू होऊन मे किंवा जूनपर्यंत देशांतर्गत उड्डाणे सुरू करण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. सामान्य विमान वाहतूक टर्मिनल, पार्किंग बे आणि हँगर्स लवकरच तयार होतील. या बदलानंतरही मुंबई विमानतळावरील सामान्य विमान वाहतुकीवर निर्बंध राहणार नाहीत. प्रवाशांना सोडण्यासाठी खाजगी आणि चार्टर विमाने शहरात उतरत राहतील, त्यानंतर ते पार्किंगसाठी नवीमुंबई विमानतळासह इतर विमानतळांवर जातील. शहर-आधारित प्रवास सुलभ करण्यासाठी कलिना जनरल एव्हिएशन टर्मिनल देखील कार्यरत राहील. बिझनेस एअरक्राफ्ट ऑपरेटर्स असोसिएशनचे व्यवस्थापकीय संचालक कॅप्टन राजेश बाली यांनी अधोरेखित केले की सध्याचे नवीमुंबई विमानतळ लेआउट आंतरराष्ट्रीय मानकांशी जुळत नसल्याने ही त्रुटी लवकर दूर करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

(पान २ वर)

## विमान कंपन्यांची तयारी सुरू

(पान १ वरून) कॅप्टन करण सहगल आणि राहुल जैन यांनी मुंबई विमानतळावरून उड्डाण केले होते.विमानाने अनेक कॅलिब्रेशन चाचण्या केल्या, धावपट्टीवरून कमी इंधनावर उड्डाण केले. भारतातील सर्वात मोठी देशांतर्गत विमान कंपनी एका वेगळ्या विमानतळाशी जोडले जात असल्याने आता यासाठी विमान कंपन्यांनी कंबर कसली आहे.याचाच भाग म्हणून इंडिगो कंपनीने यासाठी पूर्ण तयारी केल्याने नवीमुंबई विमानतळावरून लवकरच प्रवासी उड्डाण दृष्टिक्षेपात असल्याचे मानले जात आहे.

यशस्वी चाचणी उड्डाण आणि त्यानंतरच्या टीम ओरिएंटेशनवरून मुंबईच्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर व्यापक ऑपरेशन्स स्थापित करण्यासाठी इंडिगो सर्वात आधी सज्ज होण्यासाठी प्रयत्नशील आहे. नवीमुंबई विमानतळाच्या सुरुवातीच्या विमानसेवा ऑपरेशन्सवरून असे दिसून येते की इंडिगो एअरलाइन्स आणि अकासा एअर (क्यूपी) नवीमुंबईच्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर सेवा सुरू करणाऱ्या पहिल्या कंपन्यांना बहुमान मिळवतील. एअरइंडिया पुढील टप्प्यात ही सुविधा त्यांच्या नेटवर्कमध्ये समाविष्ट करण्याची योजना आखत आहे.

नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या ड्राफ्ट आरएनपी दृष्टिकोनासाठी सिम्युलेटर प्रमाणीकरण पूर्ण करून इंडिगो एअरलाइन्सने एक महत्वाचा तांत्रिक टप्पा गाठला आहे. या प्रमाणीकरण प्रक्रियेला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून मान्यता मिळाली आहे, तर भारतीय विमानतळ प्राधिकरणाने देखील तांत्रिक मंजुऱ्यांच्या प्रक्रियेला वेग दिला आहे. अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे सीईओ अरुण बन्सल यांनी विमानतळांवरील उड्डाणाच्या संदर्भात संबंधित विमान कंपन्यांना तपशील दिला आहे. विमानांचे व्यावसायिक उड्डाण ही सुविधा दक्षिणेकडील धावपट्टीचा वापर करून सुरू होणार आहे. ०८/२६ या नावाने ही धावपट्टी ओळखली जाते. पन्नास विमानांची उड्डाण क्षमता असून, टर्मिनल १ दरवर्षी २० दशलक्ष प्रवाशांना सेवा देईल जी मुंबईच्या विमान वाहतूक पायाभूत सुविधांमध्ये अत्यंत महत्वाची ठरणार आहे. नवीमुंबई विमानतळ १,१६० हेक्टरमध्ये पसरलेले आहे, ज्याचे बांधकाम १८ फेब्रुवारी २०१८ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पायाभरणी केल्यावर सुरू झाले होते.

## खासगी विमानांना नवीमुंबई विमानतळावर लवकरच मिळणार पार्किंग

(पान १ वरून) अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडने पुष्टी केल्याप्रमाणे, नवीन विमानतळ खाजगी आणि चार्टर विमानांसाठी अत्याधुनिक पायाभूत सुविधा देणारे आहे. मुंबई येथील विमानतळावर सध्या २४ विमानांसाठी पार्किंगची सुविधा आहे, नवीमुंबई विमानतळावर पार्किंग सुविधा स्थलांतरित केल्याने गर्दी होईल तसेच ऑपरेशनल कार्यक्षमता वाढेल. मुंबईत, जागेचा वापर सुनिश्चित करण्यासाठी इंजिन बंद झाल्यानंतर विमानांना अनेकदा पार्किंग स्लॉटमध्ये हलवले जाते; मात्र नवीमुंबई विमानतळावर अधिक क्षमतेमुळे मुंबई विमानतळाप्रमाणे समस्या नसतील असा दावा केला जात आहे.

२०२५ पर्यंत नवीमुंबई विमानतळ कार्यान्वित करण्याची तयारी सुरू आहे.यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, विमानतळावर विमानांच्या उड्डाणासाठी पूर्ण क्षमतेची तांत्रिक तयारी यासाठी सुरू असलेल्या आवश्यक कामांच्या बाबत चिंता व्यक्त केली जात आहे. या स्थलांतरामुळे मुंबई आणि आसपासच्या परिसरात कार्यक्षम सामान्य विमान वाहतूक पायाभूत सुविधांची वाढती गरज याबाबत विमान मालक प्रतीक्षा करत आहेत.